आकाशवाणी नागपूर,
(मराठी–वेळ सायंकाळी ०६.००)
रविवार दिनांक २७ जुलै २०२५

ठळक बातम्या

1. पारंपरिक वस्त्रोद्योग हे देशाच्या सांस्कृतिक वैविध्याचं प्रतीक असून आत्मनिर्भरतेच्या वाटचालीतला मोठा आधार असल्याचं पंतप्रधानांचं 'मन की बात' मध्ये प्रतिपादन.
2. आरोग्यसेवेच्या क्षेत्रात नागपुरातील स्व.भानुताई गडकरी मोमोरियल डायग्नोस्टिक सेंटर ठरेल मैलाचा दगड! - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला विश्वास.
3. 'महा स्माईल्स' मोहिमेमुळे विदर्भातील निष्पाप चेहऱ्यांवर पुन्हा फुलणार हसू... - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने शक्य.

आणि

4. गडचिरोलीत अतिवृष्टिमुळे पुरात वाहून तिघांचा मृत्यू, सात मार्गांवरील वाहतूक ठप्पच.

------------

'मन की बात'

पारंपरिक वस्त्रोद्योग हे देशाच्या सांस्कृतिक वैविध्याचं प्रतीक असून, आत्मनिर्भरतेच्या वाटचालीतला मोठा आधार असल्याचं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. आकाशवाणीवरच्या मन की बात या कार्यक्रम मालिकेच्या १२४ व्या भागात ते आज बोलत होते. येत्या सात ऑगस्टला साजरा होत असलेल्या दहाव्या 'राष्ट्रीय हातमाग दिवसाचा उल्लेख करुन ते म्हणाले की, सध्या देशभरात तीन हजारापेक्षा जास्त वस्त्रोद्योग स्टार्ट-अप्स सक्रिय आहेत. पैठण इथल्या पैठणी विणकर कविता ढवळे यांचा त्यांनी उल्लेख केला. कविता ढवळे यांनी यासंदर्भात आकाशवाणीशी बोलतांना आनंद व्यक्त केला –

*आज नरेंद्र मोदी साहेब पंतप्रधान आपल्या भारताचे त्यांनी कौतुक केलं आमच्या साड्या विणाऱ्यांच तर मला खूप आनंद झाला की आज आपली पैठणी पोहोचली नॅशनल लेव्हलपर्यंत, मी 23 वर्षांपासून पैठणी साड्या विणते, मला सरकारने आणि बुनकर सेवा केंद्र यांनी पण खूप मदत केली आम्हाला, त्यांनी आम्हाला लोन दिले आणि वर्कसेड दिलं, सोलर युनिट पण दिले.*

अंतराळ क्षेत्रातल्या देशाच्या प्रगतीमुळे लहान मुलांमध्ये विज्ञान विषयक जिज्ञासा वाढली असल्याचं पंतप्रधान म्हणाले. अंतराळवीर शुभांशु शुक्ला यांची मोहीम यशस्वी झाली, त्याचा देशात आनंदोत्सव झाला याचा उल्लेख त्यांनी केला. या सफलतेनंतर इन्स्पायर-मानक या उपक्रमात सहभागी होणाऱ्या मुलांची संख्या दुप्पटीनं वाढली असल्याचं त्यांनी सांगितलं. येत्या २३ ऑगस्ट रोजी साजऱ्या होणाऱ्या राष्ट्रीय अंतराळ दिनासाठी आपल्या कल्पना, नमो ॲप वर पाठवण्याचं आवाहनही त्यांनी श्रोत्यांना केलं. मराठा साम्राज्याच्या १२ किल्ल्यांना जागतिक वारसा स्थळ म्हणून युनेस्कोची मान्यता सर्व देशवासियांसाठी अभिमानाची बाब आहे असं मोदी म्हणाले.या किल्ल्यांपैकी प्रत्येक किल्ल्याशी इतिहासाचे एक पान जोडलेले आहे आणि तिथला

प्रत्येक दगड ऐतिहासिक घटनांचा साक्षीदार आहे. शत्रूंनी त्यांना रोखण्याचा खूप प्रयत्न केला, पण छत्रपती शिवाजी महाराजांनी अशक्य ते शक्य करून दाखवले, अशा शब्दांत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी छत्रपती शिवाजी महाराजांविषयी गौरवोद्गार काढले.

*12 मराठा किलों को वर्ल्ड हेरिटेज साइट्स के रूप में मान्यता दी है। 11 किले महाराष्ट्र में एक किला तमिलनाडु में हर किले से इतिहास का एक एक पन्ना जुड़ा है, हर पत्थर एक ऐतिहासिक घटना का गवाह है। सलेर का किला, जहाँ मुगलों की हार हुई। शिवनेरी जहाँ छत्रपति शिवाजी महाराज का जन्म हुआ, किला ऐसा जिसे दुश्मन भेद न सके। खांदेरी का किला समुद्र के बीच बना अद्भुत किला दुश्मन उन्हें रोकना चाहते थे, लेकिन शिवाजी महाराज ने असंभव को संभव करके दिखा दिया।*

ऑगस्ट महिन्यातल्या स्वातंत्र्य लढ्याशी संबंधित महत्त्वाच्या घटनांचा उल्लेख त्यांनी केला. खुदीराम बोस यांचं बलिदान, लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची पुण्यतिथी, गांधीजींच्या नेतृत्वाखाली सुरू झालेलं भारत छोडो आंदोलन, स्वदेशी चळवळ हा क्रम आणि १५ ऑगस्टला स्वातंत्र्यप्राप्तीपर्यंत येतो याचा उल्लेख त्यांनी केला. फाळणीच्या वेदनांचं स्मरण करून देण्यासाठी १४ ऑगस्ट रोजी फाळणी वेदना स्मृती दिन पाळला जात असल्याचंही त्यांनी श्रोत्यांना सांगितलं. जैवविविधतेची ओळख होण्यासाठी पक्षी निरीक्षणासारख्या छंदाना प्रोत्साहन देण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. स्वच्छ भारत मोहिमेला लवकरच ११ वर्षे पूर्ण होणार असल्याची आठवण त्यांनी करून दिली. दरवर्षी होणाऱ्या स्वच्छ सर्वेक्षणामुळे या भावनेला आणखी पाठबळ मिळालं असल्याचं त्यांनी नमूद केलं. स्वच्छता हे एका दिवसाचं काम नाही, आपण वर्षातील प्रत्येक दिवशी, प्रत्येक क्षणी स्वच्छतेला प्राधान्य देऊ, तेव्हाच देश स्वच्छ राहील असा सल्लाही त्यानी श्रोत्यांना दिला. हरियाली तीज, नागपंचमी, रक्षाबंधन, आणि जन्माष्टमी या सणांच्या शुभेच्छाही त्यांनी जनतेला दिल्या.

डायग्नोस्टिक सेंटर

आरोग्याच्या क्षेत्रात सेवेसोबतच संवेदनेलाही तेवढेच महत्त्व आहे. नितीन गडकरींच्या आईच्या नावाने डायग्नोस्टिक सेंटर सुरू करून गरिबांची सेवा करण्याचा विचार त्यांनी केला आणि तो प्रत्यक्षातही उतरवला. हे केंद्र आरोग्य सेवेच्या क्षेत्रात मैलाचा दगड ठरेल, असा विश्वास महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.लष्करीबाग इथल्या कमाल चौकात स्व. भानुताई गडकरी ग्रामीण विकास संस्थेद्वारा संचालित स्व. भानुताई गडकरी मोमोरियल डायग्नोस्टिक सेंटरचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते उद्घाटन झाले. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी केंद्रीय नितीन गडकरी अध्यक्षस्थानी होते. याप्रसंगी नितीन गडकरी म्हणाले, प्रतिकुल परिस्थितीत जीवन जगणाऱ्या गरिबांची सेवा करण्याचे संस्कार आईने मला दिले. त्यामुळे मी पहिल्यांदा आमदार झाल्यापासून आजपर्यंत

हजारो हार्ट ऑपरेशन्स करू शकलो. समाजातील वंचितांची, शेवटच्याच्या माणसाची सेवा करण्याचे, त्यांचे जीवन सुसह्य करण्याचा अंत्योदयाचा विचार पं. दिनदयाल उपाध्याय यांनी दिला. त्या मार्गावर सातत्याने कार्य करीत असल्याचे गडकरींनी स्पष्ट केले.

*क्योंकि पंडित दीनदयाल उपाध्याय जी ने जो सामाजिक आर्थिक चिंतन हमको बताया था कि समाज का जो आखिरी व्यक्ति है जो शोषित है, पीड़ित है, दलित है, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक दृष्टि से पिछड़ा हुआ है, उसकी हम निरंतर सेवा करें, की राजनीति का अर्थ केवल पावर पॉलिटिक्स नहीं है। वी नीड टु रेडिफाइन दी डेफिनिशन ऑफ़ पॉलिटिक्स। राजनीति का अर्थ है समाज नीती, लोक नीती, धर्म नीती, राष्ट्र नीती, राष्ट्रकारण, समाजकारण और विकास। कारण।और मैं अक्सर अपने सभी साथियों को कहता हूँ कि पॉलिटिक्स इन्स्ट्रुमेंट ऑफ़ सोशल इकोनॉमिक रिफॉर्म।*

स्व.भानुताई गडकरी मेमोरियल डायग्नोस्टिक सेंटरची 6000 चौरस फूटांचे बांधकाम असून यात 'मेड इन इंडिया' एमआरआय (MRI) मशिन्स सीटी स्कॅन (CT Scan)डिजिटल एक्स-रे (Digital X-Ray)डायलिसिस (Dialysis) अशा अत्याधुनिक सुविधा उपल्ब्ध आहेत

कॉम्प्रहेन्सिव्ह मोबिलिटी प्लान

नागपूर शहरात वाढत्या विस्तारीकरणाचा अनुषंगाने पुढील 30 वर्षात नागपूरच्या वाहतूक व्यवस्थेचा अंदाज घेण्यासाठी नागपूर शहराचा कॉम्प्रहेन्सिव्ह मोबिलिटी प्लान याविषयी नागपूरच्या मेट्रो भवन येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आणि पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे तसेच शहरातील सर्व आमदारांच्या उपस्थितीमध्ये आज बैठक घेण्यात आली त्यावेळी मुख्यमंत्र्यांनी प्रसार माध्यमांशी बोलताना सांगितलं की नागपूर शहर आणि जिल्ह्यात जे ग्रोथ सेंटर आहेत, त्यांच्या वाहतुकीच्या आराखड्यासाठी रस्ते रुंदीकरण, नवीन रस्ते, अंडरपास, उड्डाणपूल, बस आणि रॅपिड मास ट्रान्सपोर्टची व्यवस्था यासारख्या विविध प्रकल्पावर या बैठकीत चर्चा करण्यात आली. पुढील 30 वर्षांकरिता हा आराखडा पाच टप्प्यात राबवल्या जाणार असून, यातील पहिला टप्पा पुढील पाच वर्षांमध्ये पूर्ण करण्याचं आपला प्रयत्न असल्याचे त्यांनी सांगितलं.

महा स्माईल्स मोहीम

बालकांच्या चेहऱ्यावरील दुभंगलेले ओठ (क्लेफ्ट) आणि फाटलेल्या टाळू (पॅलेट) या जन्मजात विकारावर उपचार आणि जनजागृती करून या बालकांच्या निरागस चेहऱ्यावर हसू फुलविण्याचे काम महा स्माईल्स मोहीमेमुळे आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकारातून हे शक्य होणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे हे ध्येय असून, यासाठी त्यांनी विदर्भातील अशा बालकांवर उपचार आणि जनजागृतीची गरज ओळखत स्वयंसेवी संस्थांना आवाहन केले. या मोहिमेचा शुभारंभ नागपूर इथ 31 जुलै गुरुवार रोजी सकाळी 11 ते दुपारी 12.30 या

वेळेत स्वामी विवेकांनद मेडिकल मिशन हॉस्पिटल, खापरी, इथून होणार आहे. या उपक्रमाअंतर्गत पुढील 90 दिवसांत तीन विशेष मोबाईल व्हॅन विदर्भातील संपूर्ण 11 जिल्ह्यात फिरून लोकांमध्ये क्लेफ्ट विकाराविषयी माहिती देणार आहेत. यामध्ये लवकर निदान, उपचाराची शिफारस आणि गरजू बालकांसाठी मोफत शस्त्रक्रियांची नोंदणी असे विविध उपक्रम राबवले जाणार आहेत. या बालकांवर नागपूर, गोंदिया, अकोला, वर्धा इथल्या रूग्णालयात शस्त्रक्रिया केल्या जाणार आहेत.

हवामान

विदर्भातील बहुतेक ठिकाणी हलक्या ते मध्यम तीव्रतेसह काही ठिकाणी मुसळधार पावसाची शक्यता हवामान खात्याने वर्तविली आहे. विदर्भातील यवतमाळ येथे सर्वाधिक कमाल तापमान २८.८ अंश सेल्सिअस आणि भंडारा येथे किमान तापमान २१ अंश सेल्सिअस नोंदवले गेले. नागपूर आणि वर्धा-विदर्भातील काही जिल्ह्यांमध्ये काही ठिकाणी हलका पाऊस पडण्याची शक्यता आहे. गडचिरोलीत काल पर्यंत पडलेल्या मुसळधार पावसामुळे तीन जणांचा नाल्याच्या पुरात वाहून मृत्यू झाला.आज पावसाने विश्रांती दिली असली तरी सात मार्गांवरील वाहतूक ठप्पच आहे. भामरागड नजीकच्या पर्लकोटा नदीला पुन्हा पूर आल्याने भामरागड-आलापल्ली मार्गावरील वाहतूक ठप्प झाली आहे. शिवाय अन्य सहा मार्गांवरील वाहतूकही प्रभावीत झाली आहे.

विश्वचषक बुद्धिबळ स्पर्धा

फिडे महिला विश्वचषक बुद्धिबळ स्पर्धेत कोनेरु हंपी आणि दिव्या देशमुख या तुल्यबळ खेळाडूंमधे विजेतेपदासाठीची लढत सुरु आहे. पहिला सामना काल बरोबरीत राहिल्यानं दोघींनाही प्रत्येकी अर्धा गुण देण्यात आला आहे. दुसरा निर्णायक सामना सध्या जॉर्जियाच्या बातुमी इथं सुरु झाला आहे.

क्रिकेट

मँचेस्टरमधील ओल्ड ट्रॅफर्ड इथं सुरू असलेल्या अँडरसन-तेंडुलकर ट्रॉफीच्या चौथ्या कसोटी सामन्याच्या शेवटच्या दिवशी यजमान इंग्लंडविरुद्धच्या दुसऱ्या डावात भारतानं आतापर्यंत ४ बाद २२३ धावा केल्या आहेत.भारत अजूनही ८८ धावांनी पिछाडीवर आहे. आज सकाळी भारताने २ बाद १७४ धावांवर खेळ सुरू केला. केएल राहुल ९० धावांवर बाद झाला तर कर्णधार शुभमन गिलने १०३ धावा केल्या .रवींद्र जडेजा आणि वॉशिंग्टन सुंदर फलंदाजी करत आहेत.यजमान इंग्लंडने पहिल्या डावात ६६९ धावा केल्यानंतर चौथ्या दिवशी ३११ धावांची मोठी आघाडी घेतली. यापूर्वी, भारताने पहिल्या डावात ३५८ धावा केल्या. सध्या,भारत पाच सामन्यांच्या मालिकेत १-२ असा पिछाडीवर आहे.

*****